आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

बुधवार दिनांक १८ डिसेंबर २०२४

ठळक बातम्या

1. केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्या वक्तव्याचे संसदेसह नागपूरच्या विधिमंडळ अधिवेशनात पडसाद.
2. उद्या विधान परिषदेच्या सभापती पदासाठी निवडणूक होणार, महायुतीच्या वतीनं आज प्रा.राम शिंदे यांनी केला उमेदवारी अर्ज दाखल.
3. महावितरणची लकी डिजिटल ग्राहक योजना, ऑनलाईन वीज बिल भरून बक्षिसे मिळविण्याची ग्राहकांना संधी.
4. विदर्भात गोंदिया जिल्ह्यात आठ पूर्णांक आठ इतक्या सर्वात कमी किमान तापमानाची नोंद.

---

अमित शाह वक्तव्य

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांबाबतच्या विधानावरुन गदारोळ झाल्याने आज संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आधी दुपारी २ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काल राज्यसभेत बोलताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केल्याचा आरोप करत लोकसभेत विरोधी पक्ष सदस्यांनी आज प्रचंड गदारोळ केला. सभागृहाचं कामकाज सुरु झाल्यावर लगेचच काँग्रेस, द्रमुक आणि डाव्या पक्षाच्या सदस्यांनी शहा यांचा निषेध करणाऱ्या घोषणा द्यायला सुरुवात केली. संसदीय कार्य राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल आणि सत्ताधारी सदस्यांनी त्याला हरकत घेतली. उलट काँग्रेसनेच कायम बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान केला असा आरोप मेघवाल यांनी केला. केवळ राजनैतिक गरज म्हणून काँग्रेसला डॉ. आंबेडकरांबद्दल आदर व्यक्त करावा लागला असं ते म्हणाले. दोन्ही बाजूंनी घोषणा सुरु राहिल्याने सभापती ओम बिरला यांनी दोन वाजेपर्यंत कामकाज स्थगित केलं. नंतरही गदारोळ चालूच राहिल्यानं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. राज्यसभेतही काँग्रेस, द्रमुक, राजद, आमआदमी पार्टी आणि इतर विरोधी सदस्यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांच्या विधानाचा निषेध करणाऱ्या घोषणा दिल्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सर्वांसाठीच अतिशय आदरणीय आहेत असं अध्यक्ष जगदीप धनखड यांनी सांगितलं. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले की काल अमित शहा डॉ.

आंबेडकरांबाबत अतीव आदरानेच बोलले होते. मात्र काँग्रेसने डॉ आंबेडकरांच्या हयातीत आणि नंतरही त्यांची अवहेलना केली, लोकसभा निवडणुकीत त्यांना पराभूत करण्याचं कारस्थान केलं असा आरोप त्यांनी केला. काँग्रेसने केवळ मतपेढीच्या राजकारणासाठी बाबासाहेबांच्या नावाचा वापर केला असं ते म्हणाले. गदारोळ चालूच राहिल्याने अध्यक्ष जगदीप धनखड यांनी दुपारी २ वाजेपर्यंत कामकाज स्थगित केलं. नंतरही गदारोळ चालूच राहीला आणि कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं. काँग्रेसने आतापर्यंत डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा अनेकदा अपमान केला असून आपली कृत्यं काँग्रेसला आता लपवता येणार नाहीत असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या डॉ.आंबेडकरांबाबतच्या विधानावरुन आज संसदेत गदारोळ झाला त्या संदर्भात त्यांनी समाजमाध्यमावर प्रतिक्रीया दिली आहे. काँग्रेस सत्तेवर असताना दलित समुदायातल्या अनेकांची हत्या झाली असा आरोप त्यांनी केला असून अनुसूचित जाती जमातींसाठी काँग्रेसने काहीही केलं नाही, असंही मोदी यांनी म्हटलं आहे.

-----------------------------------

अंदाजित वेळापत्रक

महाराष्ट्र लोकसेवा आयोग - एमपीएससी मार्फत वर्ष २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांचं अंदाजित वेळापत्रक आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलं आहे. उमेदवारांनी अधिक माहितीसाठी आयोगाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी, असं आवाहन, महाराष्ट्र लोकसेवा आयोगानं प्रसिद्धी पत्रकाद्वारे केलं आहे.

-----------------------------------

प्रा.राम शिंदे

नागपूर इथं सुरू असलेल्या महाराष्ट्र विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात उद्या विधान परिषदेच्या सभापती पदासाठी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी महायुतीच्या वतीनं आज प्रा. राम शिंदे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्यासह चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांत पाटील, उदय सामंत आणि जयकुमार रावल हे मान्यवर नेतेही उपस्थित होते. महाविकास आघाडीनं मात्र अद्याप कोणत्याही उमेदवाराच्या नावाची घोषणा केलेली नाही.

-----------------------------------

एकनाथ शिंदे-पत्रकार परिषद

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधिमंडळ परिसरात पत्रकार परिषद घेऊन ईव्हीएम विषयक महाविकास आघाडीची भूमिका दुटप्पी असल्याचे सांगितलं ते म्हणाले की --------

*"मतदारांनी जो विश्वास दाखवला आहे, आणि महायुती विजय मिळवून दिला त्या मतदारांचा अपमान आहे खर म्हणजे जेव्हा एमव्हीए च्या बाजूने निकाल लागतो तेव्हा EVM पण चांगला असतो निवडणूक आयोग पण चांगल असतो सुप्रीम कोर्ट हाय कोर्ट पण चांगला असतो आणि जेव्हा त्यांचा विरोधा मध्ये निकाल लागला तेव्हा ते EVM वर भराऊन करण्याच काम गेल्या काही दिवासापासण करत आहे यापुढे निवडणूक आयोग वर आरोप केले होते"*

यावेळी शिंदे यांनी विविध निवडणुकांमध्ये झालेल्या ईव्हीएम च्या वापराबद्दल माहिती दिली. विरोधक कायम घटनात्मक पदांना, यंत्रणांना आव्हान देत आले असून त्यांच्या मागण्या घटनाबाह्य असल्याचे ते यावेळी म्हणाले.

---------------------------------

नवीन संकेतस्थळ

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज नागपुरात अनावरण करण्यात आले. www.home.maharashtra.gov.in या नावाचे अद्ययावत असे संकेतस्थळ आता माहितीजालवर उपलब्ध झाले आहे. मुख्यमंत्र्यांच्या रामगिरी शासकीय निवासस्थानी झालेल्या गृह विभागाच्या बैठकीत संकेतस्थळाचे अनावरण झाले.

---------------------------------

भुजबळ -राऊत

मंत्रीपद न दिल्याबद्दल राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान; छगन भुजबळ या राज्यातले ज्येष्ठ नेते आहेत, समता परिषदेच्या माध्यमातून त्यांनी देशभर अनेक आंदोलने केली. त्यांच्या रूपाने बहुजन समाजाला मोठे नेतृत्व मिळालं आहे. त्यामुळे त्यांनी आता धर्मनिरपेक्ष पक्षासोबत राहावे, त्यासाठी आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत, असे उत्तर नागपूरचे आमदार डॉ.नितीन राऊत म्हणाले.

---------------------------------

पत्रकार मोर्चा

राज्यातील पत्रकारांना न्याय आणि हक्क मिळवून देण्यासाठी नागपुरात सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनावर ग्रामीण पत्रकार संघ आणि कार्यरत पत्रकार संघाच्या संयुक्त नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात आला. आंदोलनात पत्रकारांवर होत

असलेले अत्याचार, त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करून होत असलेली कारवाई, त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

---------------------------------

लकी डिजिटल ग्राहक

महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी ३१ मार्च २०२४ नंतर सलग तीन वेळा ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरणा करणारे सर्व लघुदाब वीज ग्राहक पात्र ठरणार आहेत. १ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन वा तीन पेक्षा अधिक वीज बिले भरून योजनेच्या लाभाची संधी ग्राहकांना उपलब्ध करण्यात आली आहे. ग्राहकांना लकी ड्रा व्दारे स्मार्ट फोन, स्मार्ट वॉच अशी आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. ग्राहकांनी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरून लकी डिजिटल ग्राहक योजनेचा लाभ घ्यावा, असे महावितरणचे आवाहन आहे. महावितरणच्या प्रत्येक उपविभाग स्तरावर एप्रिल, मे व जून २०२५ या प्रत्येक महिन्यात एक प्रमाणे तीन लकी ड्रा ऑनलाईन पध्दतीने काढण्यात येणार आहेत. योजनेच्या कालावधीत ग्राहकाने नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस इ. ऑनलाईन वीज बिल भरणा पर्याय वापरून लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर दरमहा एकप्रमाणे सलग तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिने वीज बिल भरणे आवश्यक राहील. वीज बिलाची किमान रक्कम रु. १००/- असणे आवश्यक आहे.

---------------------------------

भरत गोगावले-परिवहन मंडळ

भंगार किंवा जुनाट बस न चालवता नवीन बसेस खरेदी करण्याकडे राज्य परिवहन महामंडळाचा कल असून सुमारे 1300 नवीन बस भाडेतत्वावर खरेदी करण्याचा निर्णय महामंडळाने घेतला असल्याची माहिती महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी आज नागपूर मध्ये आयोजित पत्रकार परिषदेत दिली. बस प्रवासी यांना चांगल्या सुविधा देण्यासाठी बसस्थानकाची सुधारणा बीओटी तत्त्वावर महामंडळ करणार आहे. महामंडळाच्या जागा 60 वर्षांसाठी लीझवर देण्याकरिता तसेच मुंबई सारख्या शहरातील मोक्याच्या जागा वापरण्यासाठी महामंडळ कार्यरत असून याद्वारे एसटीला चांगल्या प्रमाणात महसूल सुद्धा मिळणार असल्याची त्यांनी सांगितले.

कसोटी क्रिकेट

भारत आणि ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतला ब्रिस्बेन इथं झालेला तिसरा कसोटी सामना अनिर्णित राहिला. आज

सामन्याच्या अखेरच्या दिवशी भारताचा पहिला डाव कालच्या धावसंख्येत ८ धावांची भर घालून २६० धावांवर आटोपला. त्यानंतर ऑस्ट्रेलियानं दुसऱ्या डावात वेगानं धावा करत ७ बाद ८९ धावा झाल्या असताना डाव घोषित केला, आणि पहिल्या डावातल्या १८५ धावांच्या आघाडीसह भारतासमोर विजयासाठी २७५ धावांचं आव्हान ठेवलं. मात्र भारताच्या दुसऱ्या डावात केवळ २ षटकं आणि १ चेंडूचा खेळ झाल्यावर पंचांनी अपूऱ्या प्रकाशामुळे खेळ थांबवला. त्यानंतर पावसानं हजेरी लावल्यानं खेळ पुन्हा सुरू होऊ शकला नाही. अखेरीस सामना अनिर्णित राहिल्याचं घोषित केलं गेलं.

---------------------------------

हवामान

विदर्भात सर्वात कमी किमान तापमानाची नोंद गोंदिया जिल्हयात झाली असून, आठ पूर्णांक आठ अंश सेल्सिअस इतक तापमान नोंदविण्यात आल आहे. त्या पाठोपाठ नागपूर इथं नऊ पूर्णांक चार अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं. याशिवाय वर्धा इथं दहा पूर्णांक पाच तर गडचिरोली इथं दहा पूर्णांक सहा आणि अकोला इथ दहा पूर्णांक आठ इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. उर्वरित सर्व जिल्हयांमध्ये तापमान 11 ते 12 अंश दरम्यान आहे. दरम्यान, आगामी काही दिवसात किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. आगामी काही दिवस हवामान सर्वत्र कोरडा राहणार असून, येत्या  वीस तारखेला गडचिरोली जिल्हयात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

---------------------------------